10-02-2025-Dai-02FFinal_DH_PAN_28_04_2016-2.qxp 09-02-2025 23:15 Page 1



# काणकोणातील ११ मंदिरांच्या निवडणूका शांतीपूर्ण

## मामलेदार मनोज कोरगावकर यांची माहिती

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ९ :** काणकोण तालुक्यातील सर्व ११ ही देवस्थान समितीची निवडणूक पुर्णतः शांततापूर्ण वातावरणात तसेच उत्साहात पार पडली. मामलेदार मनोज कोरगावकर व्यक्तीश: सर्व ठिकाणी नजर ठेवून होते. काही देवस्थानात महाजन मतदार संख्या कमी होती, त्याठिकाणी दुपार पर्यंत निवडणूक प्रक्रिया संपली होती. तर जास्त मतदार संख्या असलेल्या श्रीस्थळ श्री मल्लिकार्जुन देवस्थानात संध्याकाळी ५ वाजता मतदान संपले, अशी माहिती मामलेदार मनोज कोरगावकर यांनी दिली.



श्रीस्थळ : श्री मल्लिकार्जुन देवस्थानची निवडणूक काशीपुरुष सभागृहात सुरू असतानाची क्षण चित्र.

काणकोण तालुक्यातील नोंदणीकृत देवस्थानांच्या महाजनी कायद्यानुसार आज रविवार दि.९ फेब्रुवारी रोजी, नवीन कार्यकारिणी समिती निवडणुका शांततापूर्ण वातावरणात पार पडल्या. यावेळी काही ठिकाणी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता् अशी माहिती मामलेदार मनोज कोरगावकर यांनी दिली.

सर्व ११ ही मंदिरांच्या निवडणुका सुरळीत रित्या पार पडण्याच्या दृष्टीने काणकोणच्या मामलेदार कार्यालयाने लक्ष दिले होते. रविवारी सकाळी ९ वा. या प्रक्रियेला प्रारंभ झाला होता.

श्रीस्थळ, येथील श्री मल्लिकार्जुन देवस्थानांत अनील नाईक,रविंद्र वेळीप, तर गावडोंगरी देवस्थानांसाठी नरेंद्र अग्रासिनी व उदय नाईक असे दोन-दोन तर अन्य ठिकाणी प्रत्येकी एक याप्रमाणे अन्य ठिकाणी निरीक्षक पाठवण्यात आले होते. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी या दोन्ही मंदिरांच्या ठिकाणी अतिरिक्त पोलीस कुमक मागच्या अनुभवावरून ठेवण्यात आली होती्, मुडकूड येथील देवस्थानचीही निवडणूक आज दि. ९ रोजीच झाली. अशी माहिती मामलेदार कोरगावकर यांनी दिली.

काणकोण तालुक्यातील आगोंद, मुडकूड येथील श्री लाखणेश्वर देवस्थान, लोलयें येथील श्री केशव देवस्थान, श्री दामोदर देवस्थान, माशें येथील श्री निराकार देवस्थान, पैंगीण येथील श्री परशुराम पंचैग्राम देवस्थान, श्रीस्थळ काणकोण येथील श्री मल्लिकार्जुन देवस्थान,गावडोंगरी व खोतीगाव येथील श्री मल्लिकार्जुन देवस्थान मोखर्ड येथील श्री गोपाळकृष्ण देवस्थान, खोला येथील श्री लक्ष्मीनारायण देवस्थान, सिद्धपुरुष गरवई पुरुष देवस्थान समिती दि.९ रोजी निवडली गेली. अशी माहिती मामलेदार मनोज कोरगावकर यांनी दिली.

# हरमल नारायण देवस्थानच्या अध्यक्षपदी राजेश गोकर्णकर

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ९ :** खालचावाडा येथील श्री देव नारायण देवस्थानची सर्वसाधारण बैठक रोहित गोकर्णकर यांच्या अध्यक्षतेखाली होऊन २०२५- २८ सालासाठी गुप्त मतदान प्रक्रियेत राजेश गोकर्णकर यांची अध्यक्षपदी निवड झाली. त्यांनी सुरेश खवणेकर यांच्यावर ४५ वी १५ मतांनी विजय मिळवला.



या देवस्थानची कार्यकारिणी उपाध्यक्ष विद्याधर तांडेल, सचिव शिशिर गोकर्णकर, उपसचिव सुधीर रेडकर, खजिनदार विश्वनाथ (नागेश) गोकर्णकर, उपखजिनदार सोनेश तांडेल मुखत्यार संतोष तांडेल, उपमुखात्यार बाबलो उगवेकर यांची निवड करण्यात आली. यावेळी मामलेदार कार्यालयातर्फे निरीक्षक म्हणून अभय सावंत यानी काम पाहिले. प्रारंभी माजी अध्यक्ष विश्राम तारी यांनी स्वागत केले व निवडणूक प्रक्रियेची माहिती निरीक्षक अभय सावंत यांनी दिली. यावेळी मांद्रे स्थानकाचे पोलीस अधिकारी उपस्थित होते.

# हळर्ण येथील सातेरी देवस्थानच्या अध्यक्षपदी बापू परब

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. ९ :** हळर्ण येथील श्री सातेरी देवस्थान अध्यक्षपदी बापू आपा परब यांची बिनविरोध निवड करण्यात आली.



देवस्थान कायद्याअंतर्गत २०२५ ते २०२८ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी देवस्थान समिती निवडण्यासाठी देवस्थान प्रशासनाच्या आदेशानुसार रविवारी दि. ११ रोजी देवस्थानच्या रजिस्टर महाजनांची सर्वसाधारण सभा श्री सातेरी मंदिर सभा मंडपात बोलावण्यात आली होती. या सभेस निरीक्षक म्हणून मामलेदार कार्यालयातील अधिकारी वंदन नाईक यांची उपस्थिती होते. यावेळी परब महाजन मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सर्वांनी नूतन समितीची निवड बिनविरोध करण्याचा निर्णय घेतला, त्याप्रमाणे बिनविरोध निवड झाली. समितीचे पदाधिकारी पुढील प्रमाणे अध्यक्ष - बापू परब, उपाध्यक्ष - आना परब , सचिव - राज परब , उपसचिव - नरेंद्र परब, खजिनदार - दशरथ परब, उपखजिनदार - आत्माराम परब, मुखत्यार - सुशांत परब, उपमुखत्यार - प्रशांत परब देवस्थानच्या प्रसिद्धीसाठी नवनवीन उपक्रम हाती घेण्यात येतील, असे नूतन समितीने यावेळी सांगितले. निवड समितीने सर्वांचे आभार मानले.



चोपडे : भूमिका देवस्थानच्या अध्यक्षपदी निवड झालेले सिद्धार्थ गावकर व इतर.

# भूमिका देवस्थानच्या अध्यक्षपदी सिद्धार्थ गावकर

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ९ :** रविवारी पार पडलेल्या चोपडे येथील श्री भूमिका देवस्थानच्या अध्यक्षपदी सिद्धार्थ गावकर यांची बिनविरोध निवड झाली. अन्य कार्यकारिणी पुढील प्रमाणे -

सेक्रेटरी - जालिंदर गवकर, सचिव - अनुज गावकर, एटोरणी - सीताराम गावकर, सबस्टीटूट कमिटी - उपाध्यक्ष - बाबनी गावकर, उप सेक्रेटरी - विनायक गावकर, उपखजिनदार - तुकाराम गावकर, उप एटरनी - विघ्नेश गावकर, सल्लागार - गुणा गावकर, धर्मा गावकर.

# मातृभाषेतून विद्यार्थी सुसंस्कारीत

**▶ॲड. रोशन सामंत :**
**देऊळवाडा सरकारी प्राथमिक व पूर्व प्राथमिक विद्यालयाचे स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण**

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ९ :** अलीकडे इंग्रजीचे स्तोम माजले आहे. मात्र भाषा म्हणून इंग्रजी शिकली पाहिजे. मात्र माध्यम म्हणून अजिबात नाही. मातृभाषेतून शिक्षण झाल्यास विद्यार्थ्यांत राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती व दुसऱ्यांचा आदर करण्याची वृत्ती मुरेल. मात्र भाषेतून शिकल्याने कुठेच कमी पडत नसतो, त्यामुळे मातृभाषेतून शिक्षण घेतल्याने विद्यार्थी सूसंस्कारित व सुशिक्षित होईल. याची पालकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन गोवा विद्याभारती ॲड. रोशन सामंत यानी केले.



हरमल : स्नेहसंमेलनात बोलताना ॲड. रोशन सामंत. सोबत सरपंच संतान फर्नांडिस, भिकाजी नाईक, आपा नाईक, नमिता नाईक व स्वरूप नाईक.

देऊळवाडा सरकारी प्राथमिक व पूर्व प्राथमिक विद्यालयाच्या स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण सोहळ्यात प्रमुख पाहुणे नात्याने बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर सरपंच संतान फर्नांडिस,पंच भिकाजी नाईक, निवृत शिक्षिका शरयू नाईक,पालक संघाचे अध्यक्ष स्वरूप नाईक,उपाध्यक्ष नमिता अजय नाईक व देवस्थानचे आपा नाईक उपस्थित होते.मातृभाषा ही नित्य बोलणारी भाषा असते,त्याचे उत्तम आकलन केल्यास कुठेही आम्हास अडचण होणार नाही. स्वतः वकील असल्याने मातृभाषेतून शिक्षण घेतले व पाचवीत इंग्रजी अक्षरे शिकलो, त्यामुळे कोणीही न्यूनगंड बाळगू नये.भाषेमुळे उत्तम व्यक्तिमत्व घडते असे प्रतिपादन ड सामंत यांनी केली. प्रारंभी ॲड. सामंत यांच्याहस्ते दीपप्रज्वलन झाले व सरस्वतीच्या तसबिरीस पुष्पहार अर्पण केले. स्वागत शिक्षिका सुमिता परब, बक्षीस वितरण निवेदन शिक्षिका मनाली नाईक व शुभांगी ठाकूर य ,मुख्याध्यापिका सुमित्रा सोमजी यांनी अहवाल वाचन, सरिता नाईक यांनी सूत्रनिवेदन तर मनाली नाईक यांनी आभार मानले. यानंतर विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक व मनोरंजन कार्यक्रम सादर केले व पालकांकडून शाबासकी मिळवली. यात विद्यार्थी आरव भोलेश नाईक व शौर्य सोमजी यांनी प्रज्ञा शोध परीक्षेत तर गंगाराम ठाकूर यांनी संमेलनास संगीत साथ दिल्याबद्दल खास बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

IN THE COURT OF THE INSPECTOR OF SURVEY AND LAND RECORDS,
MAPUSA - GOA
CASE No. PCSBAR01 - 25 - 42
1. Jeffrey Pio Christopher De Souza, H No 436, Dhanva Tivim Bardez Goa ....Applicants
VS
1 Konkan Railway Corporation Ltd., Panaji, Panaji - Goa ... Opponents
To, 1 Konkan Railway Corporation Ltd., Panaji Panaji Goa 2 C S Pereira r/o. Cansa, Tivim, Bardez, Goa 3 Pandurang Mhataro Parsekar.. r/o. Cansa, Tivim, Bardez, Goa 4 Carmelina D'Souza, r/o. Cansa, Tivim, Bardez, Goa 5 Victoriana Esabela, r/o. Cansa, Tivim, Bardez, Goa 6 Emil Pereira,. r/o. Cansa, Tivim, Bardez, Goa 7 Lucy Pereira r/o. Cansa, Tivim, Bardez, Goa 8 osacao Menezes, r/o. Cansa, Tivim, Bardez, Goa 9 Albertu D'Souza, r/o. Cansa, Tivim, Bardez, Goa 10 Mary Victor Pereira r/o. Cansa, Tivim, Bardez, Goa 11 Rosalina Pereira, r/o. Cansa, Tivim, Bardez, Goa 12 Josefin D'Souza. r/o. Cansa, Tivim, Bardez, Goa 13 Martin D'cruz, r/o. Cansa, Tivim, Bardez, Goa 14 Josephine Carmelina D'Melo, r/o. Cansa, Tivim, Bardez, Goa 15 Virgiuia Pereira r/o. Cansa, Tivim, Bardez, Goa 16 Maria Aurora D'Souza,r/o. Cansa, Tivim, Bardez, Goa 17 Duarte Xavier D'Souza,R/o Cansa,Tivim, Bardez,Goa 18 Anjelo Irestiano Antonio Pedro Pereira. r/o. Cansa, Tivim, Bardez, Goa 19 Deodita Femandes,R/o Cansa,Tivim,Bardez,Goa20 Joseph D'Souza,R/o Cansa, Tivim, Bardez, Goa 21 Ernestina D'Souza. r/o. Cansa, Tivim, Bardez, Goa 22 Antonio Baptista T.Pereira, R/o Cansa, Tivim, Bardez, Goa 23 Pedro Filomena D.Pereira,R/o Cansa, Tivim, Bardez, Goa 24 Domingos Cecilia Pereira, R/o Cansa, Tivim, Bardez,Goa 25 Mrs. Helen Pereira, R/o Cansa,Tivim, Bardez, Goa 26 Bernard Lourentino Pereira alias Bernardo Laurentino Pereira, R/o Cansa,Tivim,Bardez,Goa 27 Helena Francisca Rufina Pereira,R/o Cansa, Tivim,Bardez,Goa 28 Joseph Christopher Pereira, R/o Cansa, Tivim,Bardez,Goa 29 Ana Joaquina Pereira alas Ana Joaquina De mello alias Anny Pereira.R/o Cansa,Tivim,Bardez, 30 Lawrence Dionisio Lobo,R/o Cansa,Tivim,Bardez,Goa 31 Bernadette Romaldina Pereira,R/o Cansa,Tivim, Bardez,Goa 32 Leslie Francis Marin Pereira,R/o Cansa,TIvim,Bardez,Goa 33 Daphne Justina D Souza,R/o Cansa, Tivim, Bardez,Goa 34 Chantelle Bernadette D Souza,R/o Cansa, Tivim,Bardez,Goa 35 Cheryl Karen Lobo, R/o Cansa, Tivim, Bardez, Goa 36 Jane Sifarosa Josefina Pereira,R/o Cansa, Tivim,Bardez,Goa 37 Maria Faustina Pereira E Almeida.R/o Cansa, Tvim, Bardez,Goa 38 Sinfrosa Dorotina Pereira e Roy, R/o Cansa, Tivim, Bardez,Goa 39 Dionisio Vitorino Pereira,R/o Cansa, Tivim, Bardez.Goa 40 Isabella Siqueira alias Sequeira Isabella alias Isabel D Souza alias Isabel D Souza alias Enbel D Souzao Cansa, Tivim, Bardez, Goa 41 Kunal Vinayak Surlakar, R/o Cansa, Tivim, Bardez, Goa 42 Rajeshree Kunal Surlakar alias Rajeshre Sakhalkar, R/o Cansa, Tivim, Bardez, Goa 43 Executive Engineer, Works Division VIII, Water Resources Department, R/o Cansa, Tivim Bardez, 44 Ethan Allan Sequeira, R/o Cansa, Tivim, Bardez, Goa 45 Dylan Andre Sequeira, R/o Cansa, Tivim, Bardez, Goa
PUBLIC NOTICE
WHEREA the above named applicant has moved an application to this Court for Partition of HIS/HER/THEIR/ITS share under section 61 of Land Revenue Code 1968 in respect of property surveyed under Survey No. 95/1 of Tivim Village in Bardez Taluka admeasuring an area of 8406 sq. mts.
AND WHEREAS, applicant served the notices through Registered A.D to the Co-owners of the said survey number.
AND WHEREAS, notices are returned back from the postal authority with the endorsement "Insufficient address," etc.
AND WHEREAS, the applicant has made an application on 05-Feb-2025 and prayed for service of summons by issuing Public Notice in any local daily under order V Rule 20(1-A) of Civil Procedure Code, 1908 as the applicants has stated their inability to submit the detailed addresses of the above opponents and their legal heirs.
AND WHEREAS, I am satisfied that this is a fit case for grant of such permission.
NOW THEREFORE, notice is hereby given again to all the above opponents and interested parties to appear on **24-Feb-2025 at 03:00 PM** to file their say on the said date time, failing which the matter will be heard and determined in their absence.
Given under my hand and the seal of this Court on this the 5th day of February 2025.
Sd/- ( Shri. Patrick Gonsalves )
Inspector of Survey & Land Records, Mapusa Goa
SEAL

# विकासासाठी नागरिकांनी सहकार्य महत्त्वाचे

## वारखंड येथे उभारण्यात येणाऱ्या संरक्षण भिंतीच्या बांधकामाचा प्रारंभ

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ९ :** विकासासाठी पंचायतीने तसेच नागरिकांनी सहकार्य करून आपल्या गावचा विकास करून घ्यावा. पेडणे मतदारसंघाच्या विकासासाठी आपले पूर्ण सहकार्य असेल. पंचायत मंडळाने विकास कुठल्या भागात पाहिजे हे ठरवावे तसेच या कामाच्या पाठपुरावा करण्यासाठी सहकार्य करावे. वारखंड- नागझर पंचायत क्षेत्र हे मोपा विमानतळा जवळ असल्याने या भागात मोठ्या प्रमाणात भविष्यात विकास होणार आहे. यासाठी पंचायत मंडळाने सतर्क राहणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन पेडणे मतदारसंघाचे आमदार तथा गोवा हस्तकला लघू उद्योग विकास महामंडळाचे चेअरमन प्रवीण आर्लेकर यांनी शेमचे आडवण वारखंड येथे काढले.



पेडणे : संरक्षण भिंतीच्या बांधकामाचा शुभारंभ प्रसंगी आमदार प्रवीण आर्लेकर. बाजूला सरपंच कविता कांबळे, वसंत नाईक, मयुरी तुळसकर, गौरी जोसलकर, देविदास च्यारी व साबाजी परब.

शेमचे आडवण वारखंड येथे उभारण्यात येणाऱ्या संरक्षण भिंतीच्या बांधकामाचा शुभारंभ श्रीफळ वाढवून आमदार प्रवीण आर्लेकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सरपंच कविता कांबळे उपसरपंच वसंत नाईक, पंच मयुरी तुळसकर, पंच गौरी जोसलकर, पंच देविदास चारी पंच सामाजिक परब, पेडणे सार्वजनिक बांधकाम रस्ते विभागाचे अभियंते शिवानंद गावस, कंत्राटदार लिंगुडकर, दत्ताराम परब प्रभाकर परब, श्री. कांबळी आधी उपस्थित होते.

कविता कांबळी म्हणाल्या की, या भागात रस्ता अरुंद होता. त्यामुळे या भागातून मोपा विमानतळाकडे मोठ्या प्रमाणात गाड्यांची वरदळ होत आहे. अपघात क्षेत्र असल्याने त्या ठिकाणी संरक्षण भिंतीची नितांत गरज होती. पेडणे मतदारसंघाचे आमदार प्रवीण आर्लेकर यांच्या प्रयत्नाने आज या ठिकाणी संरक्षण भिंतीचे काम हाती घेण्यात येत आहे. याबद्दल त्यांनी आमदारांना धन्यवाद दिले.

वसंत नाईक मिळाले की, या भागातील गरज लक्षात घेऊन किडणे मतदारसंघाचे आमदार प्रवीण आणले कर यांनी संरक्षण भिंती मांडण्यासाठी प्रयत्न केले त्यामुळे या भागातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे त्यांनी अशाच प्रकारची कामे करावी वारखंड - नागझर पंचायतीचा त्यांना पूर्ण सहकार्य राहील, असे यावेळी वसंत नाईक म्हणाले.

पान १ वरून

## माणिपूरच्या मुख्यमंत्री बिरेन सिंहचा राजीनामा

मिळवणारे नोंगथोम्बम बिरेन सिंह हे २०१७ मध्ये भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकारचे मुख्यमंत्री बनले.६० जागांच्या मणिपूर विधानसभेत, २०१७ मध्ये भाजपला फक्त २१ जागा मिळाल्या होत्या, परंतु २८ जागा जिंकणाऱ्या काँग्रेसला मागे टाकत बिरेन सिंह यांनी राज्यात सरकार स्थापन केलं.मणिपूरमध्ये १९६३ नंतर १२ मुख्यमंत्री झाले, त्यापैकी सर्वात जास्त काळ मुख्यमंत्री राहिलेल्या काँग्रेसच्या ओकराम इबोबी सिंह यांचा कार्यकाळ सलग १२ वर्षांचा होता.मैतेई समुदायातून येणारे बिरेन सिंह यांनी मणिपूर विद्यापीठातून बीएची पदवी प्राप्त केल्यानंतर पत्रकारितेत डिप्लोमा देखील केला आहे.

------------

## फोंडा कार्निव्हल प्रेमींचा सरकारवर संताप; अनुदानाविना परेडचे आयोजन

परेडसाठी अनुदान मंजूर न करणे हा अन्याय असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. फर्नांडिस यांनी फोंडातील कार्निव्हल परेडच्या इतिहासाविषयी सांगितले. २००७ ते २०१० दरम्यान त्यांनी परेड सुरू केली होती, त्यावेळी तत्कालीन आमदार रवी नाईक यांच्या पुढाकाराने २०१२ पर्यंत अनुदान मिळत होते. मात्र, २०१२ नंतर ते थांबले. २०१७ पर्यंत कोणतेही सरकारी सहकार्य मिळाले नाही. कोविड महामारीनंतर तर सरकारने कार्निव्हलसाठी अनुदान देणेच थांबवले. कार्निव्हल प्रेमी रिवा पेरेस यांनी लोकांना आणि व्यावसायिकांना या उपक्रमासाठी उदारहस्ते देणगी देण्याचे आवाहन केले. फोंडातील कार्निव्हल उत्साह पुन्हा जागवण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,असे त्या म्हणाल्या. गेल्या तीन वर्षांपासून पोंडा शहरात कार्निव्हलचा उत्साह पूर्णतः मावळला आहे. मात्र, आता स्थानिक रहिवासी पुढे येत परेड पुन्हा सुरू करण्यासाठी कटिबद्ध आहेत. स्थानिक कलाकार आणि तरुण आपली सर्जनशीलता दाखवण्यासाठी उत्सुक असून, सरकारने फोंडावर अन्याय का केला, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

## चिखली येथे जागतिक पाणथळ भूमीदिन

आणि रेजिना मुंडी स्कूलच्या शिक्षिका अलिशा परेरा यांनी स्थानिक परिसंस्थांचे संवर्धन करण्यासाठी समुदायाची जागरूकता वाढवणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या रिझेरिया पाचेको यांनी जलद शहरीकरणामुळे चिखलीच्या पारंपरिक सिंचन प्रणाली आणि खारफुटीला धोका निर्माण झाला आहे. या पाणथळ जागांचे संरक्षण करणे म्हणजेच भविष्यातील परिसंस्थांचे रक्षण करणे,असे मत मांडले. या उपक्रमामुळे स्थानिक समुदाय आणि शाश्वत संसाधन व्यवस्थापन यामधील महत्त्वाचा दुवा स्पष्ट झाला. चिखली युथ फार्मर्स क्लब भविष्यातील उपक्रमांतून स्थानिक रहिवाशांना अधिक मोठ्या प्रमाणावर सहभागी करून घेण्याच्या योजना आखत आहे.



हळर्ण : 'जय जय गौरीशंकर' नाट्य प्रयोगातील कलाकार व साथीदार.

# 'जय जय गौरी शंकर'ला हळर्ण येथे प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. ३ :** हळर्ण येथे श्री वेताळ देवालयाच्या वर्धापनदिनानिमित्त सादर केलेल्या विद्याधर गोखले लिखित तसेच कला साधना संगीत संस्था - हणखणे इब्रामपूर यांनी सादर केलेल्या 'जय जय गौरी शंकर' नाटकाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.सर्व कलाकारांनी शेवटच्या क्षणा पर्यंत रसिकांची मने जिंकली.

सुरवातीला विष्णू गवस यांचा सन्मान चिन्न देऊन आयोजकातर्फे सत्कार करण्यात आला.

खास करून ह भ प माऊली विष्णू गवस यांनी श्री शंकराची भूमिका साकारून आपली संगीत, अभिनय कला अविस्मरणीय ठरवली.

तसेच मंडळाचे इतर कलाकार पुनेश राणे (श्रुंगी) व दर्शन मठकर (नारद), संतोषी परब (विजया) आणि निवेदिता पुणेकर (पार्वती) यांनी देखील सुरेख संगीत व अभिनय सादरीकरण केले.

त्याचप्रमाणे नंदीची भूमिका सत्यवान हळर्णकर तर शिवगण भूमिका दुर्गेश गवस आणि श्रीपाद हळर्णकर यांनी साकारली. नाटकाचे दिग्दर्शकन/नेपथ्य-अमर कोनाडकर यांनी केले. संगीत दिग्दर्शक विश्वास च्यारी तर तालरक्षक विकास नाईक होते. ध्वनी संकलनची तांत्रिक बाजू सुभाष शिरोडकर यांनी दर्जेदार सांभाळली. रंगभूषा - जितेंद्र परब (खुंटवळ). प्रकाश योजनेत तेजस खेडेकर यांनी कैलास पर्वत अगदी खास तेजोमय दाखविला. तसेच साई कळंगुटकर यांचे पाश्वसंगीत खास करून डमरू व पखवाज ध्वनी आकर्षित व श्रवणीय ठरले. नाटकाचे व्यवस्थापन श्री देव वेताळ सांस्कृतिक समिती हळर्ण यांनी केले. तसेच कला साधना संगीत संस्था भजनी मंडळ हणखणे इब्रामपूर पेडणे यांचे विशेष साहाय्य लाभले. सर्व नाट्य प्रेमिंकडून प्रयोगाचे खास कौतुक व अभिनंदन करण्यात आले.



हरमल : सेंट झेवियर महाविद्यालय आयोजित रिल्स मेकिंग स्पर्धेत द्वितीय बक्षीस प्राप्त पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय विध्यार्थी व अध्यापक.

# रील मेकिंग स्पर्धेत पार्सेकर महाविद्यालय द्वितीय

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ९ :** गोव्यात नोंदणीकृत भौगोलिक संकेत (जीआयएस) बद्दल जागरूकता निर्माण करणे आणि तरूणांमध्ये राज्याच्या समृद्ध सांस्कृतिक वारसाला प्रोत्साहन देणे हे उद्दीष्ट आहे. आयपीआर सेल असोसिएशन, आयक्यूएसीच्या, आयआयसीच्या सहकार्याने आणि भौतिकशास्त्र विभाग गोव्याच्या सेंट झेवियर महाविद्यालय, भौतिकशास्त्र विभागचा गोव्यातील महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांसाठी 'रील गोवा : शोकेसिंग द स्टेट रिच जिओग्राफिक इंडिकेशन्स' या शीर्षकाखाली राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन रील मेकिंग स्पर्धा आयोजित केली होती.

या स्पर्धेसाठी गोव्यातील सर्व महाविद्यालयांमधील १० स्पर्धकांचा समावेश होता. आमचे एचपीएसएमचे गणपत पारसेकर कॉलेज ऑफ एज्युकेशन, हरमल-गोवा, भौतिकशास्त्र विभाग, पाच विद्यार्थी सनी शेट्ये, ऋत्विक महाले, सुनील नाईक, अस्तिक साळगावकर ब गुनेश भट यांचा समवेश होता.सगळे विद्यार्थी बीएससी, बीए शाखेतील होते, त्यांना डॉ. प्रसाद नारायण पाटील, एचओडी आणि भौतिकशास्त्रातील सहाय्यक प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली भाग घेतला होता. पार्सेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयास रील स्पर्धेत दुसरे स्थान प्राप्त झाले. त्यांना चार हजार रुपयांचे रोख बक्षीस, चषक आणि प्रमाणपत्रे मिळाले. या स्पर्धेत गोव्यातील १० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. मनोहर पर्रिकर स्कूल ऑफ लॉ, गव्हर्नन्स ॲंड पब्लिक पॉलिसी, गोवा विद्यापीठाच्या कायद्याच्या सहाय्यक प्राध्यापिका मिस वैभवी राणे या स्पर्धेसाठी उपस्थित होत्या आणि गोव्याचे अथर्व साळगावकर, सिनेमॅटोग्राफर या स्पर्धेसाठी उपस्थित होते.